माझं शहर

दि. 21/01/2023

देशोन्नती

# मोटारसायकल चोरांच्या टोळीचा पर्दाफाश

## तीन आरोपी गजाआड; सहा मोटारसायकली केल्या जप्त



### नागरिकांनी सतर्कता बाळगावी- पो.नि.महेश शर्मा

दरम्यान दुचाकी चोरीच्या वाढत्या संभाव्य घटना टाळण्यासाठी नागरिकांनी सतर्कता बाळगावी. आपल्या दुचाकी वाहनाला हँडल लॉक करावे. आवश्यक ती कागदपत्रे जपून ठेवावीत. वाहन तपासणी दरम्यान पोलिसांना सहकार्य करावे असे आवाहन पोलीस निरीक्षक महेश शर्मा यांनी केले असून यापूर्वी २४ दुचाकी वाहनाला हँडल लॉक नसल्यामुळे त्यांनी सदरची वाहने पोलीस ठाण्यात आणून लावली होती. संबंधितांनी कागदपत्रे दाखवून वाहनाची खात्री केल्यानंतर त्या त्या वाहनधारकांना सदर वाहने परत करण्यात आली. ही कारवाई करत असताना मात्र काही मंडळीचे पोटसुळ उठले असल्याच्या चर्चेला उधाण आले होते.

देशोन्नती वृत्तसंकलन...

**मुदखेड** ■ पोलीस ठाण्याच्या हद्दीसह जिल्हाभर दुचाकी मोटरसायकली चोरीच्या प्रमाणात वाढ झाली असताना या प्रकरणी जिल्हाभरातील पोलीस ठाण्यात मोटार सायकल चोरीचे वेगवेगळे गुन्हे दाखल आहेत. त्या अनुषंगाने येथील पोलीस ठाण्यात गु.र.न. १९०/२२ या चोरीला गेलेल्या दुचाकीचा तपास करताना मोठ्या शिताफिने मोटार सायकली चोरणाऱ्या टोळीचा पोलीस निरीक्षक महेश शर्मा व त्यांच्या अधिनस्त पोलीस कर्मचाऱ्यांच्या टीमने वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली फर्दाफाश केला असून ६ मोटरसायकली चोरट्याकडून ताब्यात घेतल्या आहेत. तर ३ मोटरसायकल चोरांना स्थानिक पोलिसांनी गजाआड केले आहे.

शहरात एका फायनान्स कंपनीमध्ये काम करणाऱ्या साई गाडेकर या व्यक्तीने आपली बजाज डिस्कवर १५० डीटीएसआय दुचाकी अज्ञात व्यक्तीने चोरुन नेल्याची फिर्याद मुदखेड पोलीस ठाण्यात दिली होती. त्या अनुषंगाने चोरीला गेलेल्या सदर दुचाकीचा शोध घेण्यास प्रारंभ केला असता यामध्ये मोटर सायकल चोरीच्या टोळीचा सोनखेड येथील मुख्य सूत्रधार आरोपी शेख वसीम शेख अलीम हा पोलिसांच्या तावडीत सापडला.त्याच्याकडून पोलीसांनी अधिकची माहिती घेतली असता तेलंगणातील शेख कामरान पिता शेख नजीर रा. निजामाबाद व म्हैसा येथील रहिवासी आरोपी मो अल्माज रफिक या दोन चोरट्यांना देखील पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून चोरीस गेलेल्या अन्य मोटर सायकलचा शोध घेणे सुरु आहे.

वजीराबाद ,धर्माबाद, कंधार, लोहा यासह जिल्ह्यात अन्य ठिकाणी ज्या दुचाकी चोरी गेलेल्या आहेत त्या देखील संबंधित चोरट्याकडून हस्तगत होण्याची शक्यता पोलीस निरीक्षक महेश शर्मा यांनी वर्तवली. जिल्ह्यातील मोटारसायकली चोरल्यानंतर त्या तेलंगणातील बासर, निजामाबाद या ठिकाणी विक्री होत असल्याचे समजते. सदर चोरीच्या मोटरसायकली या कुंडलवाडी येथील साहेद इब्राहिम कुरेशी या व्यक्तीने बेकायदेशीरपणे खरेदी केल्या असल्याची बाबही पोलीस तपासा दरम्यान उजेडात आली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, भोकर येथील अप्पर पोलीस अधीक्षक खंडेराव धरणे, उपविभागीय पोलीस अधिकारी सिद्धेश्वर भोर, पोलीस निरीक्षक महेश शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम यशस्वी करण्यात आली. या उल्लेखनीय कार्यवाहीमध्ये पोलीस निरीक्षक महेश शर्मा, पो. हे. का. बालाजी गीते, चंद्रशेखर मुंडे, बलवीर सिंह ठाकुर, विनायक मठपती, रवी लोहाळे मधुकर पवार, किशोर पाटील, नरेंद्र ढाले, माधव वंचेवाड, पोलीस कर्मचारी हनुमंत बोरकर, अरविंद सिंनगारपुतळे, यासह अन्य पोलीस कर्मचाऱ्यांचा समावेश होता. स्थानिक पोलिसांच्या या यशस्वी कार्यवाहीचे अनेकांकडून कौतुक केल्या जात आहे.